## निशाणी क्र. ८४ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज अपीलकार यांनी मयत उत्तरवादी क्र.१५ सुभाष राजाराम हेदळकर यांचे वारस पटलावर घेणेसाठी दाखल केला आहे.

२. त्यांच्या म्हणण्यानुसार प्रस्तुत अपीलातील उत्तरवादी क्र.१५ हे दि.२७/०४/२०१३ रोजी मयत झाले आहेत. त्यांना अर्जात नमूद केलेल्या वारसांव्यतिरिक्त अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत. सबब, मयत उत्तरवादी यांचे वारसांना अपीलाचे कामी समाविष्ट करून तशी अपीलात दुरूस्ती करणेस परवानगी मिळणेसाठी त्यांनी विनंती केली आहे.

३. उत्तरवादी यांना पुरेशी संधी देवून देखील त्यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल केले नाही. सबब, अर्ज विना म्हणणे चालविणेत येत आहे.

४. अपीलकार व त्यांचे विद्वान विधिज्ञ श्री.यु.बी.कुळकर्णी यांचा पुकारा करता गैरहजर. तसेच उत्तरवादी व त्यांचे विद्वान विधिज्ञ श्री.एस.एस.सावंत यांचा पुकारा करता गैरहजर.

५. प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले. अपीलकार यांनी सदर अर्जाच्या पृष्ठयर्थ प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. तसेच मयत उत्तरवादी क्र.१५ च्या मृत्यु दाखल्याची प्रत नि.क्र.८६ सोबत दाखल केली आहे. सदरचे अपील धडेवाटपाच्या दाव्यावर दाखल केले आहे. त्यामुळे सदर अपिलात उत्तरवादीचे वारस हे आवश्यक पक्षकार आहेत. प्रस्तुत दुरूस्तीमुळे अपीलाचे स्वरूप बदलणार नाही तसेच उत्तरवादी यांचे कसलेही नुकसान होईल असे मला वाटत नाही. त्यामुळे न्यायाच्या हितार्थ अपीलकार यांना मयत उत्तरवादी क्र.१५ सुभाष राजाराम हेदळकर यांचे वारस पटलावर घेणेस परवानगी देणे न्यायोचित वाटते. परिणामी प्रस्तुतचा

अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे.

## — आदेश —

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. मयत उत्तरवादी क्र.१५ सुभाष राजाराम हेदळकर यांचे वारस पटलावर घेणेस नि.क्र.८२ वरील आदेशास अधिन राहून परवानगी देण्यात येते.

३. अपीलकार यांनी आवश्यक ती दुरूस्ती अपील मेमोत विहित मुदतीत करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by
Prakash Rajaram
Kadam
Date: 2019.12.17
13:26:42 +0530

(पी.आर.कदम)
जिल्हा न्यायाधीश—१
सिंधुदुर्ग —ओरोस

दि.१२/१२/२०१९